# महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग

## जिल्हा परिषद,जळगांव अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिराती पदभरती सन २०१९

जाहिरात क्रमांक - ०२/२०२०.

दिनांक : २ /१/२०२०

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव यांच्या आस्थापनेवरील गट क-संवर्गातील (शिक्षणसेवक) या पदांसाठी रिक्त पदे भरण्या करिता अनुसूचीत जमाती प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र धारक यांची सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून पोस्टाने अर्ज मागविण्यांत येत आहेत.पोष्टाने अथवा संबंधीत कार्यालयात अर्ज सादर करावयाचे आहेत.याबाबत सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषदेच्या **www.zpjalgaon.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### शिक्षणसेवक पद भरतीसाठी संवर्गनिहाय घोषीत पदे

| अ.क्र. | संवर्गाचे नांव/पदाचे नांव | एकुण पद संख्या (अनु.जमाती) | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक | ११६ | सर्वसाधारण-३२, महिला-३५ माजीसैनिक-१७, अशंकालीन-१२,प्रकल्पग्रस्त-०६,भुकंपग्रस्त-०२,खेळाडू-०६, दिव्यांग-०५, अनाथ-०१ |
| | एकूण | | ११६ |

पद भरती करितां सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना ही **www.zpjalgaon.gov.in** या संकेतस्थावर उपलब्ध आहेत.वरील पदासाठी समांतर आरक्षण निहाय पदांची माहिती शैक्षणिक अर्हता व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क आफॅलाईन अर्ज करण्यांसाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचना,निवड पध्दत,सर्वसाधारण अटी व शर्ती इत्यादी बाबत अधिक माहिती **www.zpjalgaon.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.अर्ज स्विकारण्याची दि.०४/०१/२०२० ते दि.०६/०१/२०२० पावेतो सांय. ५.४५ वाजेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे कार्यालयात सादर करावे.(अर्ज सादर करावयाचा कालावधी सकाळी १०.०० ते सांय. ५.४५ पर्यंत शासकीय सुटीसह) भरती प्रक्रीया/परिक्षा स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ व घट करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती जळगांव यांना राहतील.त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण - जळगांव
दिनांक- २ /१/२०२०

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती,तथा
अति,मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव

सदस्य तथा
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव

अध्यक्ष तथा
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी जळगांव

# जिल्हा निवड समिती जळगांव

## माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिकांमध्ये दिनांक ०६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे अंतर्गत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र धारक शिक्षण सेवक पदे भरणेसाठीची जाहिरात

**जाहिरात क्रमांक:- ०2/२०२०** दिनांक - ०१/०१/२०२०

-------------------------------

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्रमांक ८९२८/२०१५ मधील निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६ ब दिनांक २१ डिसेंबर २०१९, महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र दिनांक २३ डिसेंबर २०१९ नुसार सामान्य प्रशासन विभागाकडील उक्त शासन निर्णयानुसार तसेच ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र.२२६/ भाग -२/आस्था-८ दिनांक २४ डिसेंबर २०१९ अन्वये अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची संवर्ग निहाय संख्या निश्चित करुन अधिसंख्य पदांवर वर्ग झाल्यानंतर रिक्त होणारी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक व अर्हता प्राप्त उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन जाहिरातीद्वारे भरणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील पत्र क्रमांक संकिर्ण २०१८/ प्र.क्र.२२६/भाग-२/आस्था-८ दिनांक २६ डिसेंबर २०१९ नुसार मा. राज्य निवडणूक आयोग यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडील आदेशानुसार अनुसूचित जमातीच्या रिक्त पदांच्या भरतीची प्रकिया संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असल्यामुळे सदर भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र. संकिर्ण २०१९/ प्र.क्र.११९०/आस्था-१४ दिनांक २६ डिसेंबर २०१९ नुसार शिक्षकांची पद भरती करणे आवश्यक ठरल्यास जिल्हा परिषदेने त्यांचे स्तरावर पद भरती करावी. ही भरती पवित्र पोर्टलमार्फत होणार नाही अशी पद भरती करतांना शिक्षकांची अभियोग्यता बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) मधील गुणांचा विचार करण्यात यावा असे सुचित केलेले आहे.

त्याअनुषंगाने जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेल्या पदांची पदभरती साठी **अनुसूचित जमातीचे जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र धारक पात्र** उमेदवारांकडुनच समांतर आरक्षणनिहाय अर्ज मागविण्यात येत आहेत.

### (१) अर्ज करण्याची पध्दत

| | |
|---|---|
| १ | सदर पदांसाठी अर्ज दि.४/१/२०२० ते दि ०६/०१/२०२० पावेतो, सायंकाळी ५:४५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत **शासकिय सुटीसह** स्विकारले जातील. अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५:४५ वाजेपर्यंत प्राप्त झालेले अर्जच फक्त स्विकारले जातील, त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोष्टाने / कुरीयने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. |

### (२) परीक्षा शुल्क

| | उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क | परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | अर्जासोबत (Chief Executive Officer, Zilla Parishad Jalgaon) यांचे नावे काढलेला जळगांव येथे देय असलेला फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकीत धनाकर्ष (Crossed Demand Draft) अर्जासोबत जोडावा. सदर शुल्क ना परतावा राहिल, ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. धनाकर्षाच्या मागे उमेदवाराचे संपुर्ण नांव, पदाचे नांव, पत्ता व संवर्ग स्पष्टपणे नमुद करावा. | रु.१५०/- |
| २ | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. | -- |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.zpjalgaon.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. सदर संकेत स्थळाला व संबंधित विभागाला भरतीप्रकिया दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियासंबंधी आवश्यक व अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

भरती प्रकिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परिक्षेचा प्रकार,समांतर आरक्षणात अंशतः / पूर्णतः बदल करणे , संवर्ग निहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रकिया संदर्भात वाद , तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार म. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती गट-क तथा जिल्हाधिकारी जळगांव यांना राहतील. त्याबाबत उमेदवारास अथवा कोणासही कोणताही दावा करता येणार नाही. शासनाचे आदेशानुसार जाहिरातीत नमुद रिक्त पदांवर अतिरिक्त संवर्ग कक्षाकडील कर्मचारी सामावून घेणे अथवा इतर प्रशासकीय कारणांमुळे जाहिरातीत नमुद पदे कमी / जास्त होवू शकतात.

(३) जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला ३०% | खेळाडू ५% | माजी सैनिक १५ % | प्रकल्प ग्रस्त ५ % | भूकंपग्रस्त २ % | पदवीधर/ पदविका धारक/ अंशकालीन कर्मचारी १०% | अनाथ | दिव्यांग ४% |
| ०१ | शिक्षण सेवक (मराठी माध्यम ) | ११६ | ३२ | ३५ | ०६ | १७ | ०६ | ०२ | १२ | ०१ | अल्पदृष्टी-०२ अरथीव्यंग -१ कर्ण बधीर -१ मंदबुध्दी-१ |

टिप:-१) समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (दिव्यांग व माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळून) पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

वरिल नमुद करण्यात आलेल्या पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(४) आवश्यक शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक (मराठी माध्यम ) | प्रतिमाह मानधन रुपये ६०००/- | एच.एस.सी.,डी.एड/डी.टी.एड./डी.एल.एड. व शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण (T.E.T.) व शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण. शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.११९०/आरथा-१४ दिनांक २६ डिसेंबर २०१९ नुसार शिक्षण सेवक पद भरती लेखी परिक्षा घेतली जाणार नसुन, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेतील गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमांकाच्या क्रमावारीनुसार ज्या उमेदवाराचे गुण जास्त आहेत, अशाच उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यांत येईल. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र.सीईटी-२०१५ /प्र.क्र.१४९ /टिएनटी-१, दिनांक ७.२.२०१९ नुसार व तद्अनुषंगिक शुध्दीपत्रकाद्वारे सुनिश्चित केलेल्या अर्हता विचारात घेवून व आवश्यक निकषांनुसार निवड करण्यांत येईल. |

(५) आवश्यक सामाईक अर्हता खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | संगणक अर्हता | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदींनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१५ / प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पुरक पत्र क्रमांक मातंस/ २०१२ / प्र.क्र. २७०/ ३९ दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| ०२ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदींनुसार शासकिय सेवेतील भरतीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहिल.<br>प्रतिज्ञापत्रात नमुद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यागुळे उमेदवार शासकिय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

(६) निवडचे स्वरुप खालीलप्रमाणे राहिल.

| | | |
|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | एच.एस.सी., डि एड व शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण. शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.११९०/आस्था-१४ दिनांक २६ डिसेंबर २०१९ नुसार शिक्षण सेवक पद भरती लेखी परिक्षा घेतली जाणार नसुन, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेतील गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमांकाच्या क्रमावारीनुसार ज्या उमेदवाराचे गुण जास्त आहेत, अशाच उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यांत येईल. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र.सीईटी-२०१५ /प्र.क्र.१४९/टिएनटी-१, दिनांक ७.२.२०१९ नुसार व तद्अनुषंगिक शुध्दीपत्रकाद्वारे सुनिश्चित केलेल्या अर्हता विचारात घेवून व आवश्यक निकषांनुसार निवड करण्यांत येईल. |

निवडीची कार्यपध्दती

१. शिक्षण सेवक (मराठी माध्यम) या पदाकरिता एच.एस.सी., डि एड व शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.११९०/आस्था-१४ दिनांक २६ डिसेंबर २०१९ शिक्षण सेवक पद भरती लेखी परिक्षा घेतली जाणार नसुन परिक्षेतील गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमांनुसार क्रमावारीनुसार ज्या उमेदवाराचे गुण जास्त आहेत, अशाच उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यांत येईल. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र.सीईटी-२०१५/प्र.क्र.१४९/टिएनटी-१, दिनांक ७.२.२०१९ नुसार व तद्अनुषंगिक शुध्दीपत्रकाद्वारे सुनिश्चित केलेल्या अर्हता विचारात घेवून व आवश्यक निकषांनुसार निवड करण्यांत येईल.

(८) निवडसुची व तिची कालमर्यादा

जिल्हा निवड समितीने तयार केलेली निवडसुची एक वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत. त्या दिनांकापर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहिल. त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल.

(९) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती

साप्रवि शासन पूरकपत्र क्रमांक:प्रानिमं-१२१७/(प्र.क्रं.९२/१७)/१३-अ दिनांक ०२ डिसेंबर,२०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२१६/(प्र.क्रं.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून,२०१८ अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| अ)आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ब) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| क) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता(पदयुत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) |
| ड) वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

(१०) सर्वसाधारण सुचना

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. |

(११) वयोमर्यादा

अ)

I) उमेदवाराची विहित वयोमर्यादा अर्ज करण्याचा अंतिम - दि. ०६/०१/२०२० रोजीचे वय विचारात घेऊन गणले जाईल.

II)अर्ज सादर करण्याचा अंतिम - दि.०६/०१/२०२० रोजी उमेदवारांचे वय १८ वर्ष पेक्षा कमी व ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

ब) समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शिक्षण सेवक (कंत्राटी) |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | अपंग उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणना/सन ११९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य | |
| ७ | शासकीय कर्मचारी/ जिल्हा परिषद नियमीत कर्मचारी/ (नियुक्ती प्राधिकारी/सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील. | |
| ८ | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ९ | उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार | सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यांत येईल |
| १० | माजी सैनिक | सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६ अ दि. २० ऑगस्ट २०१० अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलांत झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील तसेच अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |

(१२) अर्ज खाली दर्शविलेल्या अधिका-यांच्या नावाने व खाली दर्शविलेल्या कार्यालयात सादर करावा.

| अ.क्र. | पदाचे नांव | अर्ज कोणाच्या नावाने करावा | अर्ज कोणत्या कार्यालयात सादर करावा |
|---|---|---|---|
| ०२ | शिक्षण सेवक | सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती (गट-क) तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, जळगांव पिन कोड 425001 |

(१३) अर्ज करण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-

| | |
|---|---|
| १ | सोबत दिलेल्या नमुन्यात 30 से.मी .X 20 से.मी.आकाराच्या पांढ-या जाड कागदावर हस्तलिखित / टंकलिखित / चक्रमुद्रीत / संगणकीकृत करुन अर्ज करावा. त्यावर पासपोर्ट 3.5 X 4.5 सेमी. आकाराचा अलीकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो (स्वत:ची स्वाक्षरी केलेला ) अर्जावर घट्ट लावावा. सदर अर्ज जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागात सादर करणे आवश्यक आहे. अर्ज करतांना उमेदवाराने ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे ते पद व अनुसूचित जमातीचा प्रवर्ग बंद पाकीटावर स्पष्टपणे नमुद करावे. अर्जदाराने अर्जासोबत खालील (लागु असलेल्या) प्रमाणपत्रांची सुस्पष्ट दिसतील अशा स्वसांक्षाकीत प्रमाणित केलेल्या छायांकीत / स्वाक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. संबंधित पदांचे अनुषंगाने आवश्यक शैक्षणिक अर्हता परिक्षा उत्तीर्ण बाबतचे सर्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले जातीचे वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य (Compulsory) आहे. वय दर्शविणारे प्रमाणपत्र ( जसे- शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परिक्षा प्रमाणपत्र ) |
| २ | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. जणेकरुन भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश देणे शक्य होईल. |
| ३ | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी. |
| ४ | मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास)या संबंधीची माहिती अर्जात दर्शवावी. |
| ५ | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रते मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल. |

(१४) महत्त्वाच्या सूचना:

| | |
|---|---|
| १ | उमेदवारास विभागीय परीक्षा तरोच हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |
| २ | उमेदवारांना लेखी/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| ३ | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४ | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| ५ | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| ६ | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |
| ७ | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही अपरिहार्य कारणामुळे विहित दिवशीनिवडीची कार्यवाही पुर्ण न झाल्यास याबाबतच्या आवश्यक सुचना www.zpjalgaon.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केले जाईल. |
| ८ | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| ९ | या परीक्षेत ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरतांना उमेदवारांना पदाच्या अर्हतेनुसार शैक्षणिक अर्हतेचे स्वयंसाक्षांकीत कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांकडे जाहिरातीत नमुद पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. सदरच्या जाहिरातीत नमुद करण्यांत आलेली पदे ही अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधुनच भरावयाची असल्याने उमेदवाराने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. |

(१५) विशेष सुचना

| | |
|---|---|
| १ | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| २ | माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षीत असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |